# सोहळा आणि सहजीवन-१

"वेडिंग तर मस्त आहेच, पण मॅरेज पण सुखाचं होवो हीच सदिच्छा!", मध्यंतरी माझ्या एका मैत्रिणीच्या मुलाच्या लग्नात कानावर पडलेल्या या शुभेच्छा. हे शब्द ऐकताच माझ्या मनातल्या एका जुन्याच विषयाने पुन्हा उसळी मारली ती म्हणजे लग्न म्हणजे वेडिंग किंवा सोहळा नव्हे. तर लग्न म्हणजे मॅरेज, प्रत्यक्ष सहजीवन. सोहळ्याचा जेवढा गांभीर्याने विचार केला जातो तेवढा गांभीर्याने विचार सहजीवनाचा केला जात नाही असं माझं निरीक्षण आहे.

मागे एकदा आम्ही हा प्रयोग केला होता. आमच्या लग्नेच्छू मुला-मुलींच्या गप्पांच्या कार्यक्रमात सगळ्यांना लग्न म्हणल्यावर तुमच्या डोक्यात येणारे शब्द लिहायला सांगितले होते. त्यावर संगीत, मेंदी, शॉपिंग, रिसेप्शन, बॅचलर्स पार्टी, सप्तपदी, कन्यादान असे अनेक शब्द आले. अधून मधून तडजोड, बंधन यासारखे नकारात्मक शब्द आले. पण प्रत्यक्ष सहजीवनाबद्दल किंवा ज्याला इंग्रजीत companionship म्हणता येईल त्याबद्दल फारसं कोणी काही लिहिलं नाही. लग्न म्हणल्यावर मुला-मुलींच्या डोक्यात सगळ्यात आधी हे वरचे शब्द येत असतील तर निश्चितच काहीतरी गडबड आहे असं मी मानते. आणि "आजकालची पिढी..." अशी सुरुवात करून या सगळ्याचा दोष फक्त मुला-मुलींवर टाकता येणार नाही. तो सोपा मार्ग झाला. ऐंशी-नव्वद च्या दशकात वाढलेल्या मुलांना, समाजाकडून आणि माझ्या म्हणजे पालकांच्या पिढीतल्या मंडळींकडून कळत-नकळत ज्या गोष्टी दिल्या गेल्या, त्यातली एक म्हणजे 'सेलिब्रेशन' संस्कृती. प्रत्येक गोष्ट सेलिब्रेट करायची, साजरी करायची अशी संस्कृती. आमच्या गणपतीची आरास चांगली की तुमच्या गणपतीची या धर्तीवर जशी सुप्त स्पर्धा असायची तशी मग हळूहळू सगळ्याच प्रकारच्या सेलिब्रेशन मध्ये स्पर्धा अवतरली. मग

लग्नासारखा आपल्या आयुष्यातला एक महत्वाचा सोहळा यातून कसा सुटणार!

“ते कुलकर्णी आहेत ना, त्यांनी मुलाच्या लग्नाला तब्बल साडेतीनहजार माणसं बोलावली होती…” “अहो हे तर काहीच नाही. शेजारच्या बिल्डींगमधले ते कदम आहेत त्यांनी त्यांचं अख्खं गावच बोलावलं होतं. पाच हजार माणसं होती. सगळ्यांची राहण्याची वगैरे सोय होतीच. तीन-चार दिवस चालू होते सगळे सोहळे.” “ते तमुक तमुक आहेत ना, त्यांनी पाच लाखांचा हिऱ्याचा सेट केला हो सुनेला.” “ते अमुक अमुक आहेत ना, त्यांनी आलेल्या प्रत्येकाला काहीतरी वस्तू भेट दिली.”, असे सगळे संवाद सातत्याने कानावर पडत असतात. यातून होतं असं की नकळतच आपण या स्पर्धेत ओढले जातो. ‘लग्न म्हणजे कसं एकदम जंगी झालं पाहिजे, लोकांनी आयुष्यभर लक्षात ठेवलं पाहिजे’ अशी इच्छा मनात निर्माण होते. माझ्या मते हे वाटणं नैसर्गिक नाही. हे बाजारू स्पर्धेतून आलेलं वाटणं आहे. मी आजच्या जगात irrelevant म्हणजे विसंगत ठरेन अशी एक भीती असते त्या भीतीतून जगाबरोबर राहण्याच्या प्रयत्नांतून हे येतं. जाणूनबुजून नव्हे, तर आपोआप घडतं हे. पण हे टाळण्यासाठी मात्र जाणूनबुजून प्रयत्न करावे लागतील. ते आपोआप नाही होणार.

काही वेळा या दिखाऊ सोहळ्यांमुळे वैतागून अनेकजण कसलाच सोहळा नको अशी एकदम दुसऱ्या टोकाची भूमिका घेतात. अनेकजण तर उत्सवविरोधीच बनून जातात. त्याही भूमिकेत काही तथ्य नाही. माणूस हा समाजप्रिय आणि उत्सवप्रिय प्राणी आहे. सोहळे करणं हे माणसासाठी नैसर्गिकच आहे. त्यामुळे सोहळेच करू नका असं कोणी म्हणल्यास ते काही मला पटण्यासारखं नाही. पण मग कुठे बदल हवाय नेमका? याचं उत्तर शोधायचं तर आपण एखादी गोष्ट ‘का’ करतोय या प्रश्नाने सुरुवात करावी. लागेल. अमुक अमुक सोहळा का करायचा याचं

उत्तर “तसंच केलं जातं” “त्यांनी केलं म्हणून” “नाही केलं तर बरं दिसणार नाही म्हणून” अशा आशयाचं असेल आपली गडबड होते आहे हे समजावं. लग्नासारख्या सोहळ्यांमध्ये आपली अपेक्षा असते की आपल्या नातेवाईक, मित्र परिवाराने येऊन नवविवाहित जोडप्याला शुभेच्छा द्याव्यात, जोडप्याला कधी गरज लागल्यास अडीअडचणीच्या वेळी आधार देतील असे जवळचे लोक आपल्यासाठी आहेत हा आधार मिळावा. माणसाने माणसांना धरून राहावे, त्यासाठी लग्नासारख्या सोहळ्याचे निमित्त व्हावे हा मूळ हेतू. आता हाच बाजूला पडू लागला तर काय उपयोग? आजकाल अनेक लग्नात ज्यांचे लग्न असते त्या मुलामुलीला आणि त्या दोघांच्याही पालकांना उपस्थित पाहुण्यांशी चार शब्द शांतपणे संवादही साधता येत नाही. मध्ये मी ऐकलं की एका लग्नात तर वधू-वराला सगळ्या पाहुण्यांना भेटणं शक्य नसल्याने त्यांनी मोठे स्क्रीन उभारले होते ज्यावर लोकांनी त्या दोघांकडे बघावं, जेवण करून मग निघून जावं अशी यजमानांची अपेक्षा होती. काय म्हणावे आता या सोहळ्याला?

ऐतिहासिक काळात जशी राजकीय लग्न व्हायची, तशी आजकाल स्वतःचा ‘पीआर’ जपण्यासाठी लग्नाचा वापर होतो आणि हेच गंभीर आहे. सोहळ्यांवर होणारे अवाढव्य खर्च, त्यातून अनेकदा येणारं कर्जबाजारीपण, या सगळ्या सोहळ्याचे असणारे दडपण, त्यातून रक्तदाब आणि हृदयविकार बळावणे असल्या आरोग्याशी निगडीत गोष्टी यामुळे तर हे गंभीर आहेच पण त्याचबरोबर, सोहळ्याच्या निमित्ताने पैसा, वेळ, श्रम, भावना यांची इतकी गुंतवणूक होते की सहजीवन या सगळ्यात महत्वाच्या गोष्टीकडे अक्षम्य दुर्लक्ष होतं. सहजीवन फुलणं आणि फुलवणं ही काही सोपी गोष्ट नाही. त्यासाठीही वेळ, श्रम आणि भावनिक गुंतवणुकीची गरज असते. सोहळ्यामध्ये आपण जेवढी उर्जा खर्च करतो तेवढीच किंबहुना जास्तच उर्जा सहजीवनासाठी खर्च करावी

लागते. आणि हे फक्त वधू-वरांसाठी लागू आहे असं नव्हे तर त्यांच्या पालकांसाठीही आहे. याविषयी अधिक सविस्तरपणे आता पुढच्या लेखात!